## नियमित दिवाणी दावा क्र. १८८/२०१६ मधील
## निशाणी २८ वरील आदेश
## (कृष्णत शामराव सुर्यवंशी वि. तानाजी गणपती यादव)

१. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक १३/१२/२००० चे खरेदीपत्र मुंबई तुकडेबंदी तुकडेजोड कायद्यातील तरतुदी नुसार बेकायदेशीर, निरर्थक आहे किंवा नाही हे ठरविण्याकरीता ते खरेदीपत्र मे.उपविभागीय अधिकारी यांचेकडे पाठविण्याचा हुकूम व्हावा याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जास निशाणी ३० येथे म्हणणे दाखल केले आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व संपुर्ण दाव्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत दाव्यात निशाणी २२ येथे यापुर्वी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दिनांक १३/१२/२००० चे खरेदीपत्र मुंबई तुकडेबंदी तुकडेजोड कायद्यातील तरतुदी नुसार बेकायदेशीर, निरर्थक आहे किंवा नाही हे ठरविण्याकरीता ते खरेदीपत्र मे.उपविभागीय अधिकारी यांचेकडे पाठविण्याचा हुकूम व्हावा याकरीता अर्ज दाखल केला होता. प्रस्तुतचा अर्ज देखील त्याच कारणाकरीता दाखल केला आहे. निशाणी २२ येथे देण्यात आलेल्या अर्जावर वादी व प्रतिवादी तर्फे वकीलांनी 'सदरचा अर्ज सदर दाव्याचे कामी मुद्दे फ्रेम केलेनंतर निर्णीत करणेस हरकत नाही' असे लिहुन दिले आहे.

म्हणजेच निशाणी २२ येथे देण्यात आलेला अर्ज मुद्दे निश्चीत केलेनंतर निर्णीत करण्यास दोन्ही बाजुंची हरकत नाही. निशाणी २२ येथील अर्ज मुद्दे निश्चीत केले नसल्याने अद्याप निर्णीत करणेत आलेला नाही. म्हणजेच तो अर्ज प्रलंबित आहे. एका आशयाचा एक अर्ज प्रलंबित असताना त्याच कारणाकरीता प्रतिवादींना दुसरा अर्ज दाखल करता येणार नाही. म्हणुन मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

निशाणी २८ येथील अर्ज केवळ दाखल करणेत येतो.

कडेगांव स्वाक्षरी/–

दिनांक : १७/१२/२०२१ (प्राजक्ता रा. सबनिस)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव